अमली पदार्थांच्या उच्चाटनासाठी केंद्राकडून संयुक्त कृती आराखडा : देवेंद्र फडणवीस

जिल्हावार समित्यांची स्थापना

मुंबई : समाजापुढे सध्या अमली पदार्थांचे मोठे आव्हान असून हा चिंतेचा विषय आहे. केंद्र सरकारने देखील याअनुषंगाने बैठक घेऊन सर्व राज्यांच्या गृहमंत्र्यांना एक संयुक्त कृती आराखडा दिला आहे. त्यानुसार अंमली पदार्थांची विक्री आणि सेवन रोखण्यासाठी विविध उपाययोजना करण्यात येत असल्याची माहिती उपमुख्यमंत्री तथा गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी गुरुवार, दि. ११ जुलै रोजी विधान परिषदेत दिली.

काँग्रेस आमदार अशोक उर्फ भाई जगताप यांनी या संदर्भातील प्रश्न उपस्थित केला होता. त्यावर उत्तर देताना उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, ''डार्कनेट, कुरियर, थेट संदेश, इन्स्टाग्राम, फेसबुक चॅट अशा विविध माध्यमातून अंमली पदार्थांची विक्री केली जाते. हे रोखण्यासाठी संबंधित विविध विभागांना सूचना देण्यात आल्या आहेत. 'कुरियर' कंपन्या, पोस्ट या यंत्रणांना 'कुरियरचे स्कॅन' कसे करावे, याबाबतच्या सूचना देण्यात आल्या आहेत. निर्यात होणाऱ्या मालामध्ये कंटेनरमध्ये खाली अंमली पदार्थ ठेवले जात असल्याचे आढळून आल्याने बंदरांनाही सतर्क करण्यात आले आहे. आता 'झिरो टॉलरन्स पॉलिसी' हाती घेण्यात आली असून प्रत्येक जिल्ह्यात सर्व संबंधित विभागांची समिती स्थापन करण्यात आली आहे.''

२०२३साली केलेल्या कार्यवाहीत ४०० कोटी रुपयांचा माल जप्त करण्यात आला. राज्यात मागील वर्षात एकूण १२ हजार ६४८ कारवायांमधून ८९७ कोटी रुपयांचा माल जप्त केला होता. या तुलनेत यावर्षी मे महिन्यापर्यंत ६ हजार ५२९ कारवायांमधून ४ हजार १३१ कोटी रुपयांचा माल जप्त करण्यात आला आहे. अंमली पदार्थांशी संबंधित प्रकरणात पोलिसांचा सहभाग आढळला, तर आता निलंबनाऐवजी त्यांना बडतर्फ करण्यात येणार आहे. आतापर्यंत सहा पोलिसांना बडतर्फ केल्याचे त्यांनी सांगितले.

उत्तराखंडमध्ये धागेदोरे

मुंबईतील माहिम येथील रहेजा उड्डाणपुलावर 'हेरॉईन' विकणाऱ्या एका तरुणाला ५४ लाख रुपयांचे २७० ग्राम 'हेरॉईन' बाळगल्याप्रकरणी शाहूनगर पोलिसांनी गुन्हा नोंद करून ३१ मार्च २०२४ रोजी अटक केली होती. या प्रकरणाचे धागेदोरे उत्तराखंडमध्ये आढळून आल्याने समन्वयाने पुढील कार्यवाही सुरू असल्याची माहिती देवेंद्र फडणवीस यांनी दिली.

'फनेल झोन'मधील इमारतींच्या पुनर्विकासाचा प्रश्न मार्गी लागणार

मुंबई : अंधेरी (पश्चिम) डी.एन.नगर येथील भारतीय विमानतळ प्राधिकरणाच्या 'हाय फ्रिक्वेन्सी ट्रान्समीटर' परिघातील इमारतींचा पुनर्विकास करणे, गोराई येथील जागा प्राधिकरणाला देणे आणि डी.एन.नगर येथील जागा महापालिकेला देण्याबाबत यापूर्वी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी बैठक घेतली आहे. याबाबत केंद्रीय नागरी उड्डाण विभागाला पत्रही देण्यात आले आहे. लवकरच केंद्रीय नागरी उड्डाणमंत्री, लोकप्रतिनिधी, संबंधित अधिकारी यांच्यासोबत बैठकीचे आयोजन करण्यात येईल, अशी ग्वाही मंत्री उदय सामंत यांनी गुरुवार, दि. ११ जुलै रोजी विधानसभेत दिली. याबाबत सदस्य मनीषा चौधरी यांनी लक्षवेधी सूचना मांडली होती. उत्तरादाखल मंत्री सामंत म्हणाले की, ''भारतीय विमानतळ प्राधिकरण व महापालिका यांच्या संयुक्त सभेमध्ये गोराई येथील महापालिकेच्या जागेवर ट्रान्समीटर स्थलांतरित करून डी.एन.नगर येथील प्राधिकरणाच्या जागेवर महापालिका उद्यानाचा विकास करणार आहे. या निर्णयामुळे भविष्यात विमानतळाच्या हाय फ्रिक्वेन्सी ट्रान्समीटर परिघाच्या आत असलेल्या इमारतींचा पुनर्विकास करता येईल. याबाबत केंद्रीय नागरी उड्डाण विभागासोबत बैठक घेऊन चर्चा करण्यात येईल,'' असेही त्यांनी स्पष्ट केले.

'डम्पिंग ग्राऊंड'जवळची दुर्गंधी दूर होणार : मंत्री उदय सामंत

मुंबई : ''कांजूरमार्ग येथील कचरा डेपोवर (डम्पिंग ग्राऊंड) टाकण्यात येणाऱ्या कचऱ्यामुळे परिसरात निर्माण होणारी दुर्गंधी रोखण्यासाठी तत्काळ उपाययोजना करण्याबाबत मुंबई महापालिकेला सूचना दिल्या जातील. तसेच, मुंबईतील 'डम्पिंग ग्राऊंड'च्या प्रश्नाच्या अनुषंगाने संबंधित लोकप्रतिनिधींसोबत बैठक घेऊन आवश्यक कार्यवाहीच्या सूचना महापालिका आयुक्तांना दिल्या जातील,'' अशी ग्वाही मंत्री उदय सामंत यांनी गुरुवार, दि. ११ जुलै रोजी विधानसभेत दिली.

आमदार सुनील राऊत यांनी यासंदर्भात लक्षवेधी सूचना मांडली होती. सुनील प्रभू, अ‍ॅड. आशिष शेलार, सुनील राणे, रमेश कोरगावकर यांनी या चर्चेत सहभाग घेतला. ईशान्य मुंबई भागातील 'डम्पिंग ग्राऊंड'मुळे येणारी दुर्गंधी, त्याचा त्या भागातील नागरिकांना होणारा त्रास, ब्राझीलच्या टेक्नॉलॉजीचा हवाला देत महापालिकेने केलेली फसवणूक, आदींची चौकशी करून अहवाल प्रसिद्ध करण्याची मागणी अ‍ॅड. आशिष शेलार यांनी केली.

यावर, मंत्री सामंत म्हणाले की, ''मुंबईत जमा होणाऱ्या एकूण ६ हजार ४०० टन कचऱ्यापैकी ५ हजार ८०० टन कचरा कांजूरमार्ग येथील 'डम्पिंग ग्राऊंड'वर जमा करण्यात येतो. मात्र, या परिसरात दुर्गंधी पसरत असल्याच्या आणि त्यामुळे आरोग्याला धोका निर्माण होत असल्याच्या तक्रारी येत आहेत. त्यामुळे कचरा दुर्गंधी पसरू नये, यासाठी तत्काळ उपाययोजना करण्याचे निर्देश दिले आहेत. याशिवाय, हे 'डम्पिंग ग्राऊंड' स्थलांतरित करण्याच्या पर्यायावर विचार सुरु असल्याचे त्यांनी सांगितले. दरम्यान, कचरा विलगीकरण आणि विल्हेवाट लावण्याचे प्रकल्प राबवूनही स्थानिक नागरिकांना दुर्गंधीच्या त्रास होत असल्याने संबंधित प्रकल्प राबविणाऱ्या संस्थेची चौकशी करण्यात येईल,'' असे त्यांनी सांगितले.

जाहीर सूचना

माझ्या अशिलांच्या सूचनेअंतर्गत याद्वारे सूचना देण्यात येते की, माझे अशील, श्री. अनुज अय्यर सदनिका क्र. १०५, १ला मजला, तृप्ती, चेंबूर कैराली सीएचएस लि., छेडा नगर, चेंबूर, मुंबई ४०००८९, यापश्चात सदर "सदनिका" असे उल्लेखित, विक्रेत्या श्रीमती विजयम क्रिष्णन, श्री. व्ही. आर. क्रिष्णन यांच्या पत्नी यांच्याकडून आणि श्री. व्ही. आर. क्रिष्णन यांच्या फक्त उर्वरित कायदेशीर वारस, म्हणजेच १) श्री. रामाक्रिष्णन क्रिष्णन, श्री. व्ही. आर. क्रिष्णन यांचा मुलगा, २) सौ. गायत्री सिंग, श्री. व्ही. आर. क्रिष्णन यांची मुलगी, ३) सौ. लक्ष्मी सुनिल, श्री. व्ही. आर. क्रिष्णन यांची मुलगी यांच्या पुष्टीकरणाद्वारे खरेदी करू इच्छितात. सर्वप्रथम, सदर सदनिका श्री. व्ही. आर. क्रिष्णन यांच्या मालकीची होती, आणि त्यांच्या मृत्युनंतर, त्यांच्या नामनिर्देशित पत्नी श्रीमती विजयम क्रिष्णन यांना हस्तांतरित झाली होती, त्या ती सदनिका सर्व उपरोल्लेखित वारसांच्या मंजुरीने विक्री करू इच्छितात. सदर सदनिकेमध्ये कोणत्याही मालकी, वारसाहक्क, वारसा, हक्क, हिस्सा, शीर्षक, हितसंबंध, रक्कम किंवा कोणचाही दावा/दावे, इ. यामार्गे कोणतेही दावे असणाऱ्या, सर्व व्यक्ती किंवा प्राधिकाऱ्यांनी त्याबाबत लेखी स्वरुपात, मला त्याच्या समर्थनार्थ कागदोपत्री पुराव्यासह माझ्या निम्नउल्लेखित कार्यालयात सदर प्रसिद्धी दिनांकापासून १४ दिवसांच्या आत सूचित करणे आवश्यक आहे, असे न केल्यास कोणत्याही व्यक्ती/प्राधिकाऱ्यांकडून कोणताही दावा नाही असे मानण्यात येईल, आणि माझे अशील ती खरेदी करण्यास मुक्त असतील.

सदर १४ दिवसांच्या कालावधीनंतर जर कोणतेही दावे प्राप्त झाल्यास, त्यांचा विचार करण्यात येणार नाही, आणि माझे अशील, श्री. अनुज अय्यर सदनिका क्र. १०५ योजनेनुसार खरेदी पूर्ण करतील.

ठिकाणः मुंबई
दिनांकः १२.०७.२०२४

सही/-
सिद्धांत सिन्हा
ॲडवोकेट मुंबई उच्च न्यायालय
३०३, ३रा मजला, डोल बिन शिर बिल्डींग,
प्रताप लंच होमजवळ,
फोर्ट, मुंबई - ४००००१.
ईमेलः sidsinha93@gmail.com

मध्य रेल्वे
आधुनिकीकरण कामासाठी सल्लागार सेवा

निविदा सूचना क्र: - आरआर/पीआर/डब्ल्यूसी/१९०९/२४-२५/१५. कामाचे नाव: दुरुस्ती कार्यशाळा माटुंगाच्या आधुनिकीकरण कामासाठी सल्लागार सेवा. परिमाण: १. निविदा समाप्ती आणि उघडण्याचा दिनांक आणि वेळ: २९.०७.२०२४ रोजी १२:०० वाजता. निविदेचा तपशील आणि निविदा कागदपत्रे www.ireps.gov.in संकेतस्थळावर उपलब्ध आहे. निविदा संकेतस्थळाद्वारे ई-निविदाकरण स्वरूपात स्वीकारल्या जातील.

AK-240

धोकादायक आणि स्फोटक पदार्थासह दंडनीय अपराध आहे.

मध्य रेल्वे
विविध नागरी कामे

डीआरएम, गतीशक्ती, मुंबई विभाग, सीएसएमटी यांचे कार्यालय. **खुली ई-निविदा सूचना क्र. सीआर-जीएसयूसीएसएमटी-२०२४-७/१४.०६.२०२४. अनु. क्र.: १.** नागोठणे गुड्स शेड-आरसीसीसह सक्युलेटिंग एरिया आणि जोड रस्त्यांची सुधारणा, स्टॅकिंग शेडची तरतूद आणि लेबर रूमची तरतूद. **अंदाजे मूल्य: रु. १०६४.७२ लक्ष. ईरठे: रु. ६,८२,४००/-, पूर्तता कालावधी: १५ महिने. अनु. क्र.:२.** तुर्भे गुड्स शेड – किमान सुविधांसह (सध्याची लेबल रूम आणि गुड्स फलाटावरील मर्चंडरूम) सह सध्याची लेबलरूम आणि मर्चंड रूमच्या रिलोकेटिंगद्वारे पूर्ण लांबीच्या बीसीएनएचएल रेक सामावण्यासाठी तरतूद, जुने सीओपी, व्हॅली गटर्स, डाऊन टेक पाईप्स बदलणे, केपीएचएन बाजूकडे मजुरांसाठी नवीन टॉयलेट ब्लॉकची तरतूद. **अंदाजे मूल्य : रु. १३५५.०१ लक्ष, इरठे: रु. ८,२७,५००/-. पूर्तता कालावधी: १५ महिने. उपरोक्त निविदेचा निविदा समाप्तीचा दिनांक आणि वेळ : १५.०७.२०२४ रोजी ११.०० वा. पर्यंत आणि ११.०० वा. नंतर उघडण्यात येतील.** **i)** प्रस्तावित बोलीदारांना निविदेच्या आणि जर असल्यास शुद्धिपत्रकाच्या तपशीलासाठी www.ireps.gov.in संकेतस्थळाला भेट देण्याची विनंती करण्यात येत आहे. **(ii)** निविदाकार उपरोक्त ई-निविदेमध्ये केवळ www.ireps.gov.in संकेतस्थळाद्वारे ई-निविदेमध्ये इलेक्ट्रॉनिक स्वरूपात सहभागी होऊ शकतात आणि सदर ई – निविदेमध्ये प्रत्यक्ष प्रस्ताव सादर करता येणार नाहीत. जर प्रत्यक्ष सादर करण्यात आल्यास ते नाकारण्यात येतील किंवा विचारात घेतले जाणार नाहीत. **(iii)** बोली सुरक्षा ई-पेमेंट गेटवे द्वारे रोख स्वरूपात किंवा भारतामधील शेड्यूल्ड व्यावसायिक बँकेकडील बँक गरंटी बॉडच्या स्वरूपात सादर किंवा निविदा कागदपत्रामध्ये नमूद करण्यात आल्याप्रमाणे सादर करावे. **(iv)** अधिक माहितीसाठी संपर्क करा: विभागिय रेल्वे व्यवस्थापक ह्यांचे कार्यालय: गती शक्ती युनिट, तळ मजला, मध्य रेल्वे दूरध्वनी क्र. ०२२ ६७४५३९२८ **(v)** सदर निविदा सार्वजनिक प्रापण धोरण आदेश दिनांकित १६-९-२०१७ अनुसार मान्यताप्राप्त आहे. निविदेचा पूर्ण तपशिल **www.ireps.gov.in** वर उपलब्ध आहे.

AK-244

धोकादायक आणि स्फोटक पदार्थासह दंडनीय अपराध आहे.

क्षयरोगमुक्तीसाठी लसीकरण मोहीम

मुंबईसाठी तज्ज्ञांची समिती स्थापन

पावसाळी अधिवेशन
सुहास शेलार

मुंबई : ''देशाला २०२५पर्यंत क्षयरोगमुक्त करण्याचे ध्येय केंद्र सरकारने ठेवले आहे. देशाच्या क्षयरोग मुक्तीच्या लढ्यात महाराष्ट्र राज्यही मागे नाही. राज्यातही क्षयरोग निर्मुलनाबाबत प्रभावी कार्यवाही करण्यात येत आहे. क्षयरोगाच्या उच्चाटनासाठी केंद्र सरकारने ११ राज्यांमध्ये १८ वर्षांवरील नागरिकांना क्षयरोगाची लस देण्याची मोहीम सुरू केली आहे. यामध्ये महाराष्ट्राचाही समावेश आहे. लस घेण्यासाठी नागरिकांचे समुपदेशन करून जास्तीत जास्त नागरिकांना लस देण्याचा शासनाचा प्रयत्न राहील,'' अशी माहिती सार्वजनिक आरोग्य व कुटुंबकल्याण मंत्री प्रा. डॉ. तानाजी सावंत यांनी गुरुवार, दि. ११ जुलै रोजी विधानसभेत प्रश्नोत्तराच्या तासात दिली.

याबाबत विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी प्रश्न उपस्थित केला होता. या प्रश्नाच्या चर्चेत सदस्य पृथ्वीराज चव्हाण, राजेश टोपे, मनीषा चौधरी, आशिष शेलार, डॉ. नितीन राऊत, प्राजक्त तनपुरे, रोहित पवार यांनी भाग घेतला. आरोग्यमंत्री डॉ. तानाजी सावंत म्हणाले की, ''मुंबई शहरात दाट लोकसंख्येमुळे क्षयरोगाचे प्रमाण जास्त आहे. मुंबई शहरातील क्षय रुग्णांचे प्रमाण कमी करणे, क्षयरोगाचा प्रसार रोखण्यासाठी आरोग्य संचालकांच्या अध्यक्षतेखाली तज्ज्ञांची समिती स्थापन करण्यात येईल. ही समिती महिनाभरात अभ्यास करून अहवाल सादर करेल. राज्याच्या लोकसंख्येच्या प्रमाणात मुंबई शहरात २७ टक्के रुग्णसंख्या आहे. त्यामुळे राज्य क्षयरोगमुक्त करण्यासाठी मुंबई शहरातून क्षयरोग हद्दपार करणे गरजेचे आहे,'' असेही त्यांनी सांगितले.

औषधांचा तुटवडा नाही

''राज्यात क्षयरोगावरील औषधांचा पुरवठा केंद्र सरकारमार्फत करण्यात येतो. पुरवठ्यामध्ये अडचण निर्माण होण्याबाबत केंद्राने दि. २ फेब्रुवारी रोजी राज्यांना पत्र दिले. पत्र मिळताच राज्य शासनाने औषध उपलब्धतेसाठी उपाययोजना केल्या. तातडीने औषधी खरेदीसाठी जिल्हा स्तरावर १.६३ कोटींचा निधी वितरीत करण्यात आला आहे. राज्यात कुठेही क्षयरोगावरील औषधांची कमतरता नसून ३ 'एफडीसी–ए' औषधांचा पुरेसा पुरवठा आहे,'' असेही आरोग्यमंत्र्यांनी स्पष्ट केले.

पुणे अपघातप्रकरणी वेळेत गुन्हा दाखल

उपमुख्यमंत्र्यांची स्पष्टोक्ती

मुंबई : पुणे येथील कल्याणीनगर–एअरपोर्ट रोडवर दि. १९ मे रोजी पहाटे २.३० वाजता झालेल्या अपघातप्रकरणी पोलिसांनी सकाळी ८.१३ वाजता गुन्हा नोंदविला आहे. पुणे पोलीस आयुक्तांनी यात सक्रियतेने कार्यवाही केली असल्याचे उपमुख्यमंत्री तथा गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी गुरुवार, दि. ११ जुलै रोजी विधान परिषदेत स्पष्ट केले.

विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी या घटनेत पुणे पोलीस आयुक्तांसह दोषी असलेल्यांवर कारवाई करण्यासंदर्भात लक्षवेधी सूचना मांडली होती. या अनुषंगाने झालेल्या चर्चेत सदस्य सर्वश्री विक्रम काळे, सतेज पाटील, शशिकांत शिंदे, किरण सरनाईक आदींनी सहभाग घेतला. या घटनेसंदर्भात माहिती देताना उपमुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, ''ही घटना पहाटे २.३० वाजता घडली असून यामध्ये दोन जणांचा मृत्यू झाला आहे. याबाबतचा गुन्हा सकाळी ८.१३ वाजता नोंदविण्यात आला. तर सकाळी १०.३० वाजता वरिष्ठ अधिकारी आल्यानंतर त्यांनी यात बदल करून या कलमाऐवजी ३०४ हे कलमांतर्गत गुन्हा नोंद केला. आरोपीचे वय १८ वर्षांपेक्षा कमी असल्याने बालन्यायालयासमोर प्रकरण नेण्यात आले.

आरोपीची वैद्यकीय तपासणी केली नसल्याबद्दल पोलीस निरीक्षकांवर कारवाई केली असून पुणे पोलीस आयुक्त अमितेशकुमार यांनी सक्रियतेने कार्यवाही केल्याने त्यांच्यावर कारवाई करण्याची आवश्यकता नसल्याचेही उपमुख्यमंत्र्यांनी स्पष्ट केले. आरोपीचे रक्तनमुने बदलण्यात सहभागी असलेल्या डॉक्टरवर तसेच ड्रायव्हरला गुन्ह्याचा आरोप स्वत:वर घेण्यासाठी दबाव टाकल्याप्रकरणी आरोपीचे वडील व आजोबांवरही गुन्हा दाखल करण्यात आल्याची माहिती त्यांनी यावेळी दिली.

शहरी नक्षलवादाला लगाम; विधानसभेत विधेयक सादर



मुंबई : शहरी नक्षलवादाच्या उच्चाटनासाठी महायुती सरकारने पुढाकार घेतला असून, गुरुवार, दि. ११ जुलै रोजी 'महाराष्ट्र विशेष जन सुरक्षा विधेयक २०२४' विधानसभेत मांडण्यात आले. शहरी नक्षलवादाला रसद पुरविणारे आणि आश्रय देणाऱ्यांविरोधात कठोर शिक्षेची तरतूद या विधेयकात करण्यात आली आहे. विशेष म्हणजे बंदी घातलेल्या अथवा बेकायदेशीर संघटनांना मदत करणारी व्यक्ती ही अशा संघटनेचा सदस्य नसली तरीही शिक्षेस पात्र ठरणार आहे.

मंत्री उदय सामंत यांनी विधानसभेत हे विधेयक मांडले. या विधेयकात व्यक्ती आणि संघटनांच्या नक्षली बेकायदेशीर कृत्यांना प्रतिबंध करण्यासाठी कठोर शिक्षेची तरतूद करण्यात आली आहे. राज्याच्या नक्षलग्रस्त आणि दुर्गम भागांपुरता आता नक्षलवादाचा धोका मर्यादित राहिलेला नाही. शहरी भागातही नक्षल आघाडीच्या संघटनांद्वारे त्याचे लोण पसरत आहे. शहरी नक्षलवाद्यांच्या माध्यमातून सशस्त्र नक्षल्यांना सुरक्षित आश्रय आणि रसद पुरवली जाते. पोलिसांनी नक्षलवाद्यांकडून जप्त केलेल्या साहित्यातून शहरांमध्ये माओवाद्यांची 'सुरक्षित आश्रयस्थळे' आणि 'शहरी अड्डे' असल्याचे आढळून आले आहे. हे शहरी नक्षलवादी जनतेत अशांतता निर्माण करतात व राज्यातील सार्वजनिक सुव्यवस्था बिघडवतात. अशा नक्षलवादी संघटनांवर प्रभावी आणि कायदेशीर मार्गाने नियंत्रण ठेवण्यासाठी हे विधेयक असल्याचे या विधेयकच्या उद्देशात नमूद करण्यात आले आहे.

शहरी नक्षलवादाविरोधात इतर राज्यांप्रमाणे महाराष्ट्रात जनसुरक्षा कायदा बनविण्यात आला आहे. शहरी नक्षलवाद रोखण्यासाठी या राज्यात असलेला कायदा महाराष्ट्रात नसल्यामुळे अशा संघटना सक्रिय असल्याचे सरकारने विधेयकात स्पष्ट केले आहे.

धर्माच्या आधारे आरक्षण देता येणार नाही : सुधीर मुनगंटीवार

मुंबई, दि. ११ : प्रतिनिधी

राज्यघटनेमध्ये धर्माच्या आधारे आरक्षण देण्याची तरतूद नाही. मुसलमान समाजामध्ये कुणी मागास असतील, तर त्यांना मागासवर्गीयांसाठी असलेल्या आरक्षणातून लाभ घेता येतो; पण मुसलमान म्हणून धर्माच्या आधारे आरक्षण देता येणार नाही, असे मंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी गुरुवार, दि. ११ जुलै रोजी विधानसभेत स्पष्ट केले.

समाजवादी पक्षाचे आमदार अबू आझमी यांनी माहिती सूत्राच्या अंतर्गत (पॉइंट ऑफ इन्फॉर्मेशन) विधानसभेत मुसलमानांना आरक्षण मिळाले नसल्याचा मुद्दा उपस्थित केला. मुसलमानांसाठी सरकारने लवकरात लवकर आरक्षण घोषित करावे, अशी मागणी आझमी यांनी केली. त्यावर सुधीर मुनगंटीवार यांनी उत्तर दिले. मतांच्या राजकारणामध्ये धर्म आणू नका. आपण सर्व भारतमातेचे सपूत आहोत, असे आवाहन करतानाच मुनगंटीवार यांनी धर्माच्या आधारे मुसलमानांना आरक्षण देता येणार नाही, ही भूमिका सरकारच्या वतीने स्पष्ट केली.

'बाबासाहेबांच्या स्मारकाचे काम त्वरित पूर्ण करणार'

मुंबई : ''इंदू मिल येथे उभारण्यात येणारे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्मारकाचे बांधकाम वेगाने पूर्ण करण्यात येत आहे. पुतळ्याचे प्रारुप (मॉडेल) सुद्धा मान्य झाले आहे. तथापि, आंतरराष्ट्रीय दर्जाच्या या स्मारकातील हा पुतळा भव्य असल्याने त्यासाठी वेळ लागत आहे. स्मारकाचे हे संपूर्ण काम लवकर पूर्ण करण्यात येईल,'' असे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी गुरुवार, दि. ११ जुलै रोजी विधान परिषदेत सांगितले.

आमदार विजय ऊर्फ भाई गिरकर यांनी परळ येथील बीआयटी चाळीत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे वास्तव्य असलेल्या जागेत स्मारक उभारण्याबाबत लक्षवेधी सूचना मांडली होती. या अनुषंगाने झालेल्या चर्चेत सदस्य अमोल मिटकरी यांनी सहभाग घेतला. चर्चेदरम्यान इंदू मिल येथे उभारण्यात येत असलेल्या स्मारकाबाबत विचारलेल्या प्रश्नावर उपमुख्यमंत्री फडणवीस यांनी स्पष्टीकरण दिले.

मूळ प्रश्नावर बोलताना मंत्री उदय सामंत म्हणाले की, ''बीआयटी चाळ क्र. १ मधील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे वास्तव्य असलेल्या खोली क्र. ५० व ५१ येथे राष्ट्रीय स्मारक उभारण्याबाबत मुंबई महानगरपालिकेकडून सुसाध्यता अहवाल प्राप्त करून पुढील आवश्यक ती कार्यवाही केली जाईल. या अनुषंगाने मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली बैठक घेऊन तेथे सध्या राहत असलेल्या कुटुंबांच्या पुनर्वसनाबाबत चर्चा करण्यात येईल,'' असेही त्यांनी सांगितले.

वैनगंगा-नळगंगा नदीजोड प्रकल्पाला राज्यपालांची मंजुरी

मुंबई : विदर्भातील ६ जिल्ह्यांतील शेतकऱ्यांसाठी वरदान ठरणाऱ्या 'वैनगंगा–नळगंगा नदीजोड प्रकल्पा'ला राज्यपाल रमेश बैस यांनी तत्वतः मंजुरी दिली आहे. याबद्दल उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्यपालांचे आभार मानले आहेत.

सुमारे ८० हजार कोटींचा हा नदीजोड प्रकल्प आहे. या प्रकल्पाची मंजुरीची फाईल राज्यपाल रमेश बैस यांच्याकडे होती. त्याला तातडीने मंजुरी देण्यात यावी, अशी विनंती करण्यासाठी मंगळवार, दि. ९ जुलै रोजी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्यपाल रमेश बैस यांची भेट घेतली होती. त्यानंतर गुरुवार, दि. ११ जुलै रोजी त्याला राज्यपालांनी तत्वतः मान्यता दिली. तसे पत्र जलसंपदा विभागाला दिले आहे.

या प्रकल्पातून विदर्भातील सिंचनाचे चित्र पालटणार आहे. वैनगंगा–नळगंगा नदीजोड प्रकल्प नागपूर, वर्धा, अमरावती, यवतमाळ, अकोला आणि बुलढाणा आदी विदर्भातील ६ जिल्ह्यांना वरदान ठरणार आहे. या प्रकल्पामुळे ३.७१ लाख हेक्टरवर क्षेत्र सिंचनाखाली येईल. पिण्याचे पाणी तसेच सिंचनाचे मोठे प्रश्न यातून सुटणार आहेत. या नदीजोड प्रकल्पाच्या कालव्याद्वारे सौरऊर्जानिर्मिती होणार आहे. यात ४२६.५ किलोमीटर लांबीच्या कालव्यातून तलावात पाणी नेण्यात येणार आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वात आमचे महायुती सरकार शेतकऱ्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे आहे, असे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले आहे.

'कोस्टल रोड'वरून आजपासून धावणार बेस्ट

मुंबई, दि. ११ : प्रतिनिधी

मुंबई सागरी किनारा रस्ता प्रकल्प 'कोस्टल रोड'वरून शुक्रवार, दि. १२ जुलैपासून वातानुकूलित बससेवा सुरु करण्यात येणार असल्याची माहिती बेस्ट प्रशासनाने दिली आहे. हा नवीन बसमार्ग क्र. ए– ७८ असणार आहे.

दरम्यान, बेस्ट प्रशासनाने दिलेल्या माहितीनुसार, ''बेस्ट उपक्रमातर्फे 'एनसीपीए' (नरीमन पॉईन्ट) आणि भायखळा स्थानक (प.) दरम्यान मरीन ड्राईव्ह, 'स्वराज्यरक्षक धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज सागरी किनारा मार्ग' (कोस्टल रोड), ब्रीच कॅन्डी रुग्णालय, हाजी अली, महालक्ष्मी स्थानकमार्गे नवीन वातानुकूलित बसमार्ग क्र. ए–७८ शुक्रवारपासून कार्यान्वित करण्यात येत आहे. या बसचे प्रवासभाडे किमान सहा रुपये ते जास्तीतजास्त १९ रुपये इतके असेल. या बसमार्गावरील बसगाड्या संपूर्ण आठवडा कार्यान्वित राहतील.''

या बसचा प्रवासमार्ग

'एनसीपीए' (नरिमन पॉईंट) हॉटेल ट्रायडंट नेताजी सुभाष मार्ग मरीन ड्राईव्ह–'कोस्टल रोड'– पारसी जनरल रुग्णालय जंक्शन– वत्सलाबाई देसाई चौक (हाजी अली)– महालक्ष्मी रेसकोर्स–महालक्ष्मी रेल्वे स्थानक–सातरस्ता भायखळा स्थानक (प).

विनाईल केमिकल्स (इंडिया) लिमिटेड

सीआयएन: एल२४१००एमएच१९८६पीएलसी०३९८३७
नोंदणीकृत कार्यालय: रिजन्ट चेंबर्स, ७ वा मजला, जमनालाल बजाज मार्ग, २०८,
नरिमन पॉईंट, मुंबई – ४०० ०२१. दूरध्वनी: २२८२ २७०८/६९८२९०००
ई–मेल: cs.vinylchemicals@pidilite.com **वेबसाइट:** www.vinylchemicals.com

३८ वी वार्षिक सर्वसाधारण सभा आणि ई–मतदान माहितीसंदर्भात नोटीस

येथे सूचित करण्यात येत आहे की, विनाईल केमिकल्स (इंडिया) लिमिटेड कंपनीच्या ३८ व्या एजीएम आयोजनाच्या नोटीसमध्ये नमूद केलेले कामकाज पूर्ण करण्यासाठी (''कंपनी'') ची ३८ वी वार्षिक सर्वसाधारण सभा (''एजीएम'') गुरूवार, ८ ऑगस्ट २०२४ रोजी दुपारी १२.०० वाजता व्हिडिओ कॉन्फरन्सिंग (''व्हीसी'')/अन्य दृकश्राव्य माध्यम (''ओएव्हीएम'') याद्वारे होणार आहे. कंपनीचे नोंदणीकृत कार्यालय हे सभेचा स्वायत्त स्थळ (डिमड्ड व्हेन्यू) म्हणून राहणार आहे,

कंपनी कायदा, २०१३ (''द ॲक्ट'') तसेच त्याअंतर्गत जारी केलेल्या नियमांच्या सर्व लागू असलेल्या तरतुदी त्याचबरोबर सिक्युरिटीज अँड एक्सचेंज बोर्ड ऑफ इंडिया (''सेबी'') (लिस्टिंग ऑब्लिगेशन्स ॲण्ड डिस्क्लोजर रिक्वायरमेंट्स्) रेग्युलेशन्स, २०१५ यांच्या एकत्रित वाचनासह कंपनी व्यवहार मंत्रालयाने (''एमसीए'') ५ मे २०२० रोजी जारी केलेले परिपत्रक क्र. २०/२०२०, २८ डिसेंबर २०२२ चे परिपत्रक क्र. १०/२०२२ आणि सेबीने जारी केलेले १३ मे २०२२ चे परिपत्रक क्र. SEBI/HO/CFD/CMD2/CIR/P/2022/62 आणि ५ जानेवारी २०२३ चे परिपत्रक क्र. SEBI/HO/CFD/PoD-2/P/CIR/2023/4 यांच्यासह एमसीए आणि सेबीने जारी केलेली आणि लागू असलेल्या अन्य परिपत्रकांच्या (येथून यापुढे एकत्रितरित्या ''परिपत्रके'' असे संदर्भित) अनुपालनानुसार व्हीसी/ओएव्हीएमच्या माध्यमातून कंपनीची एजीएम आयोजित केली जाणार आहे. त्याचबरोबर, उपरोक्त परिपत्रकांनुसार, ३८ व्या एजीएम आयोजनाची नोटीस आणि आर्थिक वर्ष २०२३–२४ चा वार्षिक अहवाल कंपनी आणि /अथवा डिपॉझटरी पार्टिसीपंटस् (''डिपी'') याच्याकडे ईमेल पत्ते नोंदणीकृत असलेल्या सर्व समभागधारकाना इलेक्ट्रॉनिक पध्दतीतून पाठविण्यात आलेला आहे.

दूरस्थ ई–मतदान आणि एजीएमदरम्यान ई–मतदानासाठीच्या सूचना:

१. कायद्याच्या कलम १०८ मधील तरतुदी आणि अन्य लागू असलेल्या तरतुदींना अनुसरून, जर काही असल्यास, याच्यासह कंपनीज (मॅनेजमेंट ॲण्ड ॲडमिनिस्ट्रेशन) नियम २०१४ चा नियम २० आणि लिस्टींग रेग्युलेशन्सची नियमावली ४४ यांच्या एकत्रित वाचनासह, एजीएममध्ये प्रस्तावित केलेल्या ठरावांवर मतदानाचा हक्क बजावण्यासाठी, समभागधारकांना दूरस्थ ई–मतदानाची सुविधा उपलब्ध करून देताना कंपनीला आनंद होत आहे. इलेक्ट्रॉनिक मतदान प्रणालीचा वापर करून सभासदांनी मतदान करण्याची आणि ३८ व्या एजीएममध्ये भाग घेण्यासाठी व्हीसी/ओएव्हीएम सुविधेसह एजीएम दरम्यान ई–मतदानाची सुविधा नॅशनल सिक्युरिटीज डिपॉझिटरी लिमिटेडद्वारे (''एनएसडीएल'') प्रदान केली जाईल.
२. दूरस्थ ई–मतदानाचा कालावधी सोमवार, ५ ऑगस्ट २०२४ रोजी सकाळी नऊ वाजता सुरू होऊन बुधवार, ७ ऑगस्ट २०२४ रोजी सायंकाळी पाच वाजता संपणार आहेत. बुधवार, ७ ऑगस्ट २०२४ ला सायंकाळी पाच वाजता दूरस्थ ई–मतदानाच्या माध्यमातून मतदान करण्यास परवानगी दिली जाणार नाही. ३८ व्या एजीएममध्ये ई–मतदानाची सुविधा देखील उपलब्ध करून दिली जाईल आणि सभेला उपस्थित असलेले सभासद परंतु यापूर्वी रिमोट ई–व्होटिंगद्वारे आपले मत दिलेले नाही, ते ३८ व्या एजीएमच्यावेळी मतदान करू शकतील.
३. ३८ व्या एजीएममध्ये दूरस्थ ई–मतदान आणि मतदानासाठी सभासदांची पात्रता ठरवण्याची कट–ऑफ तारीख मंगळवार, १ ऑगस्ट २०२४ आहे. सभासदांचे रजिस्टर अथवा डिपॉझिटरीजकडून सांभाळल्या जाणाऱ्या लाभार्थी मालकाच्या रजिस्टरमध्ये मंगळवार १ ऑगस्ट २०२४ पर्यंत (''कट–ऑफ तारीख'') नाव नोंदणीकृत असलेल्या व्यक्तीच दूरस्थ मतदान आणि एजीएमच्या ठिकाणी ई–मतदानाची सुविधा वापरण्यास पात्र राहतील.
४. इलेक्ट्रॉनिक माध्यमातून २०२२–२०२३ आर्थिक वर्षाचा वार्षिक अहवाल पाठवल्यानंतर आणि कट–ऑफ तारखेपूर्वी ज्या सभासदांनी समभाग विकत घेतलेले आहेत, त्यांना विनंती करण्यात येत आहे की, मतदान करण्यासाठी वापरकर्ता आयडी आणि पासवर्ड प्राप्त करण्याकरिता अवलंबिल्या जाणाच्या प्रक्रियेसाठी एजीएमची सूचना पाहावी.
५. डीमटेरिअलाइज्ड स्वरुपात, छापील स्वरुपात समभाग धारण करणार्या समभागधारकांसाठी आणि ज्या समभागधारकांनी त्यांचे ईमेल पत्ते नोंदणीकृत केलेले नाहीत त्यांच्यासाठी एजीएम आयोजनाच्या नोटीसमध्ये एजीएमदरम्यान दूरस्थ ई–मतदान किंवा ई–मतदानाबाबतच्या सूचना नमूद केलेल्या आहेत. एजीएममध्ये व्हीसी/ओएव्हीएमद्वारे उपस्थित राहण्याच्या सूचना देखील एजीएमच्या नोटीसमध्ये दिलेल्या आहेत.
६. ज्या सभासदांनी रिमोट ई–मतदानाद्वारे आपले मत दिलेले आहे, ते ३८ व्या एजीएममध्ये भाग घेऊ शकतात, परंतु त्यांना पुन्हा त्यांचे मत देण्याचा अधिकार असणार नाही.
७. कंपनीच्या संचालक मंडळाने कंपनी सचिव म्हणून कार्यरत असलेल्या मेसर्स पारीख ॲण्ड असोसिएटसचे श्री. पी. एन. पारीख (सदस्यसंख्या क्र.एफसीएस ५३२७, सीपी क्र.१२२८) अथवा त्यांच्या अनुपस्थितीत श्री मितेश धबलीवाला (सदस्यत्व क्रमांक एफसीएस ८३३१, सीपी क्र. ९५११) अथवा त्यांच्या अनुपस्थितीत श्रीमती शर्वरी शाह (सदस्यत्व क्रमांक एफसीएस ९६९७, सीपी क्रमांक ११७१७) यांची निष्पक्ष आणि पारदर्शक पद्धतीने मतदान प्रक्रिया पार पाडण्यासाठी छाननीकर्ता म्हणून नियुक्ती केलेली आहे.
८. इलेक्ट्रॉनिक पध्दतीने मतदानाबाबत काही शंका असल्यास, www.evoting.nsdl.com या संकेतस्थळावर डाऊनलोड विभागात उपलब्ध असलेले ''फ्रिक्वेन्डली आस्कड् क्वेश्चन्स (एफएक्यूज) फॉर शेअरहोल्डर्स'' आणि ''ई–व्होटींग युझर मॅन्युअल फ़ॉर शेअरहोल्डर्स'' याचा कृपया संदर्भ घ्यावा अथवा (०२२) ४८८६ ७००० या क्रमांकावर कॉल करावा अथवा आपली विनंती श्री. अमित विशाल, उप उपाध्यक्ष, एनएसडीएल यांना evoting@nsdl.co.in या ई–मेलवर पाठवावी.

अधिक तपशीलासह ३८ वी एजीएम नोटीस आणि आर्थिक वर्ष २०२३–२४ चा वार्षिक अहवाल कंपनीचे संकेतस्थळ www.vinylchemicals.com, तसेच बीएसई लिमिटेड (''बीएसई'') चे www.bseindia.com, नॅशनल स्टॉक एक्सचेंज ऑफ इंडिया लिमिटेड (''एनएसई'') चे संकेतस्थळ www.nseindia.com आणि एनएसडीएलचे संकेतस्थळ www.evoting.nsdl.com यावरसुध्दा उपलब्ध करून देण्यात आलेला आहे.

इलेक्ट्रॉनिक स्वरुपात समभाग धारण करणारे आणि ज्यांनी आपला ईमेल अथवा केवायसी तपशील अद्ययावत केलेला नाही, अशा समभागधारकाना त्यांच्या डिपींनी सुचिविलेल्या पध्दतीनुसार त्यांच्या डिमॅट खात्यात सदर तपशीलांची नोंदणी/अद्ययावतीकरण करण्याची विनंती केली जाते. छापील स्वरुपात समभाग धारण करणारे आणि ज्यांनी आपला ईमेल अथवा केवायसी तपशील अद्ययावत केलेला नाही, त्यांनी कंपनीचे रजिस्ट्रार आणि शेअर हस्तांतरण प्रतिनिधी, लिंक इनटाईम इंडिया प्रायव्हेट लिमिटेड यांच्याकडे विहित अर्ज आयएसआर–१ मध्ये सदर तपशीलाची नोंदणी/अद्ययावतीकरण करण्याची विनंती केली जाते. समभागधारक www.vinylchemicals.com वर कंपनीच्या संकेतस्थळावर उपलब्ध असलेल्या संबंधित अर्जाचा वापर करू शकतात.

आगामी एजीएममध्ये समभागधारकांच्या मंजुरीच्या अधीन राहत, कंपनीच्या संचालक मंडळाने त्यांच्या ३ मे २०२४ रोजी झालेल्या बैठकीत, ३१ मार्च २०२४ रोजी संपलेल्या आर्थिक वर्षासाठी प्रत्येकी १/– रुपये दर्शनी मूल्याच्या समभागासाठी, प्रति समभाग ६.७५/– रुपये एकूण लाभांशाची शिफारस केलेली आहे. लाभांश, जर समभागधारकांनी मंजूर केला तर, ज्या समभागधारकांची नावे रेकॉर्ड तारखेनुसार, म्हणजेच, बुधवार, २४ जुलै २०२४ पर्यंत परिस्थितीनुसार सभासदांच्या रजिस्टरमध्ये किंवा लाभार्थी मालकांच्या रजिस्टरमध्ये नोंद झालेली असतील, अशा समभागधारकांना बुधवार १४ ऑगस्ट २०२४ रोजी किंवा नंतर दिला जाईल.

विनाइल केमिकल्स (इंडिया) लिमिटेडसाठी

मुंबई
१२ जुलै, २०२४

पी.सी. पटेल
कंपनी सचिव